## 'शारदा'कार : गोविंद बल्लाळ देवल

मधुकर खरे

आपल्या सांगलीचे सुपुत्र आणि मराठी भाषेतील थोर नाटककार श्री. गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म सांगली जवळील हरिपूर या गांवी दिनांक १३ नोव्हेंबर १८५५ रोजी झाला. माध्यमिक शिक्षणासाठी ते जेव्हा बेळगावला आले तेंव्हा बेळगाव येथे शिक्षक म्हणून नोकरी करीत असलेले नाटककार आण्णासाहेब किर्लोस्कर यांचे व त्यांचे गुरु– शिष्यांचे जे नाते निर्माण झाले ते अखेरपर्यंत टिकून राहिले.

देवलांचा स्वभाव हा वरीष्ठांशी जुळवून घेण्याचा नसल्याने त्यांनी १८८७ मध्ये नोकरी सोडली ती पुन्हा कोठेही नोकरी करायची नाही हा निर्धार करुनच. उरलेले सारे आयुष्य नाट्यलेखन आणि नाट्य व्यवसायात घालवून त्यांनी आमरण मराठी रंगभूमीची सेवा केली आणि १४ जून १९१६ रोजी त्यांना देवाज्ञा आली.

इ. स. १८८६ ते १८९९ या तेरा वर्षात देवलांनी एकूण सात नाट्यकृती निर्माण केल्या. त्यापैकी अनुक्रमे दुर्गा, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, झुंझारराव, फाल्गुनराव, शापसंभ्रम, ही रुपांतरित नाटके आणि शेवटचे अतिशय गाजलेले संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक म्हणजे शारदा होय. शारदा हे केवळ एकच सामाजिक नाटक लिहून देवलांनी सामाजिक नाटकांचे स्वरूप आमूलाग्र बदलून टाकले, संविधानिक स्वभावचित्रण, संवाद, भाषा इत्यादी गुणांचे लेणे सामाजिक विषयांना देवलांमुळेच लाभेल या नाटकातील नाट्यगुण अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे असल्याने आज शंभर वर्षांनी सुध्दा हे नाटक तितक्याच आवडीने पाहिले जाते.

यशस्वी नाटककार म्हणून देवलांची जशी ख्याती आहे त्याचप्रमणे उत्कृष्ट नाटक दिग्दर्शक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. किर्लोस्कर आणि गंधर्व या महाराष्ट्रातील लोकप्रिय नाटक मंडळीमधून नाट्य दिग्दर्शक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. इतकेच नाही तर वेणीसहार, शाकुंतल, झुंझारराव या नाटकांमधून गौतमी आणि झुंझारराव या भूमिकाही केला. पांडित्य रसिकता, बहुश्रुतता, परकीय कलाकृतींकडेही स्वतःच्या दृष्टिकोनामधून पाहाण्याचा आग्रह भाषेचा कमालीचा साधेपणा परिणामकारक संवाद लिहिण्याचे कसब, व्यक्तिचित्रणातील सूक्ष्म दृष्टी आणि सहजसुंदर पद्यरचना इत्यादी अभिजात नाटककाराच्या अंगी आवश्यक असणाऱ्या गुणांचा सुंदर मिलाफ देवलाच्या ठिकाणी झाला होता. अनेक नाटकांचे यशस्वी रुपांतर केल्यामुळे कादंबरीचे नाटकात कसे रुपांतर करावे याचीही त्यांनी भावी नाटककारांना दिशा दाखवण्याचे काम केले देवल हे पाश्चात्य प्रभावापासून अलिप्त साहित्याने ते संस्कृत नाटकांमध्येच फार रमलेले दिसतात. किर्लोस्करांप्रमाणे देवलांच्या प्रतिभेची ठेवण वास्तवादी स्वरुपाची आहे. पुरोगामी विचारसरणीच्या प्रभावी सामाजिक नाटकांची आधुनिक मराठीत मुहूर्तमेढ रोवण्याचे सर्व श्रेय देवलांकडेच जाते.

सध्या प्रासंगिक आणि अस्सल मराठी वळणाच्या मराठी गद्यात कथानकाचा परिपोष करण्याचे आणि स्वभावाच्या सूक्ष्म छटा रंगविण्याचे किती सामर्थ्य असते. हे देवलांनी आपल्या मराठी गद्यलेखनाने दाखवून दिले. त्यांनी कधीही नटाच्या आवडी निवडी आणि सवयी लक्षात घेऊन आपल्या लेखनाला मुरड घातली नाही. देवल हे स्वतः उत्तम नाट्य दिग्दर्शक असल्याने त्यांच्या बहुतेक सर्व नाटकांचे प्रायोगिक मूल्य, फार उच्च दर्जाचे आहे.

संयम ही केवढी मोठी वाङ्‌मयीन शक्ती आहे हे देवलांची नाटके वाचली म्हणजे कळून येते. रंगभूमीवरचे प्रत्येक वाक्य कानावर पडले की मनात शिरले पाहिजे असा देवलांचा कटाक्ष होता. पात्रांचे वय, स्वभाव, अपेक्षा आणि प्रसंग यांचा विचार करुन ते शब्द योजना करीत असल्याने प्रत्येक पात्राची बोलण्याची धाटणी वेगळी वाटते.

For www.sahityasagarsangli.com

खाडिलकर, गडकऱ्यांशी देवलांची तुलना केली की देवलांच्या थोरवीचा एक मोठा तेजस्वी पैलू दृष्टीत भरतो. खाडिलकर–गडकरी यांच्या नाटकातील पात्रे बोलत नसून निरनिराळ्या पाठांचे निमित्त करुन खाडिलकर – गडकरीचं बोलत आहेत असे वाटते. देवलांनी आपल्या लेखणीचे असे भलते लाड कधीच केले नाहीत त्यांच्या पात्रांचे संवाद संवादच असतात. वाद नसतात, संभाषणे संभाषणेच असतात. भाषणे नसतात. शुद्रकासारख्या प्रख्यात नाटककारच्या 'मृच्छकटिकम्' नाटकाने भाषांतर करताना मुळातल्या संवादाची काटछाट करावयास ते कचरले नाहीत, नाटकातील संवाद लिहिताना ते सुटसुटीत असावेत याकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. यादृष्टीने विचार करायचा झाला तर त्यांचे शारदा हे एकच नाटक वाचले तर त्याचा पुरेपूर अनुभव येईल स्वतःची लेखनाची हौस भागवण्यासाठी त्यांनी नाट्यलेखन केले नाही त्यामुळेच त्यांचे नाटकातील संवाद जसे सोपे, प्रसादपूर्ण आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या नाटकातील गाणीही अगदी सोपी, प्रसंगानुकूल आणि परिणामकारक आहेत.

शेवटी थोर कादंबरीकार प्रा. ना. सी. फडके यांच्या शब्दात सांगायचे झाले तर ''देवल, खाडिलकर आणि गडकरी हे तिघेही मातब्बर नाटककार खरे, परंतु तिघांच्या यशाचे उगमस्थान मात्र भिन्न भिन्न गुणात आहे, तिघेही प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून आपल्या मुठीत ठेवतात. परंतु प्रत्येकाचा मंत्र वेगळा आहे, मार्ग वेगळा आहे. दंगा धोपा, आरडा ओरडा, थैमान हे खाडिलकरांचे कृष्ण कवीचे, सुदर्शन चक्र, चमत्कृती हा राम गणेश गडकरी यांचा रामबाण होता गोविंद बल्लाळ देवल यांची आयुष्ये मात्र पूर्णपणे वेगळी होती. देवलांना चमत्कृतीचा हव्यास नव्हता. प्रसाद आणि संयम हे दोन गुण म्हणजे त्यांचा ट्रेडमार्क होता, देवलांचा असा एक खास देवलटच होता.

आज रंगभूमीला पुन्हा एकदा ग्लानी आली आहे. निव्वळ भाषाविलास आणि कृत्रिम तंत्रांची मदत घेऊन मराठी रंगभूमीचा वैभवकाल पुन्हा येणार नाही. त्यासाठी प्रसाद, संयम, रसिकता इत्यादी आयुधं धारण करणाऱ्या गोविंदाचाच पुन्हा अवतार झाला पाहिजे. असे मला ठामपणे वाटते.